राष्ट्रीय आरोग्य अभियान
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी
जिल्हा परिषद, भंडारा
नोंदणी क्र. F.११०७५ दिनांक ३०.११.२००५

राष्ट्रीय आरोग्य अभियान, आयुष्यमान भारत व राष्ट्रीय आयुष अभियान कार्यक्रमातर्गत आरोग्यवर्धिनी उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आयुर्वेदिक दवाखान्यामध्ये योगसत्र (Event Base घेण्याकरिता योग प्रशिक्षकांची निवड करावयाची आहे. त्याकरिता उमेदवार हा नामांकित व मान्यताप्राप्त योगसंस्थेतुन सर्टिफीकेट, पदवी, पदवीकाधारक ( कमीत कमी १ वर्ष ) असावा त्याकरिता खालील अटी व शर्तीनुसार इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि. 3.10.23.. ते दि 10.10.23 पर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय जिल्हा परिषद भंडारा येथे आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करावे.

१) हे पद जिल्हयातील ०७ तालुक्यातील आरोग्यवर्धिनी केंद्राकरिता राहील.
२) योगप्रशिक्षक नामांकीत व मान्यताप्राप्त संस्थेमधुन सर्टिफीकेट, पदवी, पदवीकाधारक ( कमीत कमी १ वर्ष) असावा.
३) योगप्रशिक्षक मानसिक व शारीरीकदृष्टया स्वस्थ असावा (Medical Fitness Certificate)
४) योग प्रशिक्षक (पुरुष/महिला) यांना योग सत्र घेण्यासाठी रुपये ५००/- प्रति योग सत्र, प्रति आठवडा प्रति आरोग्य वर्धिनी केंद्र याप्रमाणे मानधन देण्यात येईल तसेच आयुष आरोग्य वर्धिनी केंद्राकरिता योग प्रशिक्षक (पुरुष/महिला) यांना योग सत्र घेण्यासाठी रुपये २५०/- प्रति योग सत्र याप्रमाणे मानधन देण्यात येईल आणि त्यांना महिन्याभरामध्ये कमीत कमी एका तासाचे ३२ योगसत्र घ्यावयाचे आहे.
५) योग प्रशिक्षकाने १ दिवसात २ पेक्षा जास्त सत्र घेता येणार नाही.
६) हे Event Base उपक्रम ३१ मार्च, २०२४ पर्यंतच मंजुर आहेत.
७) प्रकल्प अंमलबलावणी आराखडा सन २०२३ - २०२४ अंतर्गत सदर Event Base उपक्रमास मान्यता दिली नाही अथवा कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास सदर सेवा व निवड रद्द करण्यात येईल.
८) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा. तसेच ते निवड प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालु राहिल याची दक्षता घ्यावी.
९) जिल्हयातील उमेदवारांना निवडी करिता प्राधान्य देण्यात येईल.
१०) निवड प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलाविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच संदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.
११) निवड प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दवाव तंत्राचा वापर किंवा अनूचीत मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्या उमेदवारी निवड कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.
१२) पुनर्नियुक्तीबाबत, शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा मा. न्यायालयामध्ये करता येणार नाही.
१३) योग प्रशिक्षक (पुरुष/महिला) यांना योग सत्राबाबत सविस्तर माहिती होणे करिता सोबत मार्गदशक सुचना जोडण्यात येत आहेत त्याची नोंद घ्यावी.
१४) निवड प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, निवड प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे ईत्यादी सर्व अधिकार मा. अध्यक्ष जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी तथा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, भंडारा यांनी राखून ठेवलेले आहे.

सचिव
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण
सोसायटी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद भंडारा

अध्यक्ष
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण
सोसायटी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद भंडारा

# अर्जाचा नमुना

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी
## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, भंडारा
## पदासाठी अर्ज

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून स्वतः साक्षांकित करणे.

**अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र. :-**

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा.

१. उमेदवाराचे संपुर्ण नाव :- ........................................

२. वडिलांचे संपुर्ण नाव :- ........................................

३. जन्मतारीख :- दिवस.........महिना.........वर्ष...........
अक्षरी........................................
........................................

४. कायमस्वरुपी संपूर्ण पत्ता :- ........................................
........................................
........................................

५. दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :- ........................................
(कायम सुरु असलेला क्रमांक)

६. ईमेल आयडी (अनिवार्य) :- ........................................

७. शैक्षणिक अर्हता (साक्षांकित प्रत जोडावे) :- फक्त योग बाबत

| धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील | बोर्ड/विद्यापीटाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | वर्षनिहाय गुण | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण गुण | मिळालेले गुण | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

८. अनुभव :- (शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियान)
अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी अन्यथा अनुभवाचे गुण ग्राहय धरले जाणार नाही.

| अ. क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी (वर्ष,महिने) | कामाचे स्वरुप | मानधन/वेतन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

९. इतर शैक्षणिक अर्हता :........................................
........................................

१०. अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत.
१)........................................ २)........................................
३)........................................ ४)........................................
५)........................................ ६)........................................

मी, असे प्रमाणित करतो/करते की, आपले कार्यालयातील..................................या कंत्राटी पदाची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून चुकीची व खोटी आढळून आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

ठिकाण :- .....................

दिनांक :- .....................

उमेदवाराची स्वाक्षरी :-............................

उमेदवाराचे पुर्ण नाव :-............................

आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

| | |
|---|---|
| दुरध्वनी - ०२२ - २२७१७५०० <br> फॅक्स - ०२२ - २२६४२९५५ <br> E-mall - mdnrhm.mumbal@gmall.com | आरोग्य भवन, ३रा मजला, <br> सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, <br> सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |

जा.क्र.राआसो/आयुष/आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र/योग प्रशिक्षक नियुक्ती/ ६०६०० - ६७७/2023

दि.01/08/2023
03/08/2023

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

विषय:- आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र स्तरावर योग प्रशिक्षकांची निवड करणेबाबत.

संदर्भ:- १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.राआसो/आयुष/आयुष आरोग्यवर्धिनी/योग प्रशिक्षण /१०९६१६-७५२/२१-२२ दि.२९/१२/२०२१.
२) राष्ट्रीय आयुष अभियान आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र मार्गदर्शक सुचना.
३) मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची मान्य टिपणी दि.२७/०७/२०२३.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आयुष्मान भारत योजने अंतर्गत राज्यातील आयुष दवाखान्यांचे आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये रुपांतर करण्यात येत आहे. सन २०१९-२० मध्ये २९४ आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रास मंजुरी प्राप्त होऊन सध्या कार्यान्वित करण्यात आलेले आहे. सन २०२३-२४ मध्ये ९६ नवीन आयुष दवाखान्यांचे आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये रुपांतर करण्यास मंजुरी प्राप्त झालेली आहे. केंद्र शासनाकडून आरोग्यवर्धिनी केंद्रावर योग सेवा पुरविणेसाठी मार्गदर्शक सुचना तसेच योग अभ्यासक्रम आयोजित करणारे विद्यापीठ व संस्था यांची यादी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सोबत जोडलेल्या यादीमधील योग अभ्यासक्रम आयोजित करणारे विद्यापीठ किंवा संस्थांमधून योग प्रशिक्षकाची पदवी प्राप्त केलेल्या उमेदवाराची योग प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात यावी.

सदर योग प्रशिक्षक निवड करणेसाठी संदर्भ क्र.१ च्या पत्रानुसार खालीलप्रमाणे जिल्हास्तरावर त्रिस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हा आरोग्य अधिकारी- | अध्यक्ष |
| २) | जिल्हा आयुष अधिकारी- | सदस्य |
| ३) | जिल्हयातील नामांकित योग प्रशिक्षण संस्थेचे प्रमुख- | सदस्य |

उपरोक्त नमुद त्रिसदस्यीय समितीने आयुष आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत मंजुर आयुष दवाखाना येथे व कार्यक्षेत्रामध्ये योग सत्र आयोजनाकरिता योग प्रशिक्षक नेमणेबाबत कार्यवाही करावी. योग प्रशिक्षक नेमताना समितीमार्फत प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पाहून, तसेच प्रशिक्षक हा सोबत जोडलेल्या यादीमधील योग अभ्यासक्रम आयोजित करणारे विद्यापीठ किंवा संस्थेमधून योग प्रशिक्षणाची पदवी धारण केल्याबाबतचे प्रमाणपत्र तपासून खात्री करावी व त्यानुसार योग प्रशिक्षक नेमावेत. तसचे योग प्रशिक्षक निवडतांना जिल्हयातील नामांकित योग प्रशिक्षक संस्थेचे प्रमुख (सदस्य) म्हणून उपस्थित असणे आवश्यक आहे.

(कृ.मा.प.)

Scanned with CamScanner

संदर्भ क्र.३ च्या मान्य टिपणीनुसार व आयुष आरोग्यवर्धिनी केंद्राच्या प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार योग प्रशिक्षक यांचे कामाचे स्वरुप व मानधन खालील प्रमाणे राहील.

१) आयुष आरोग्यवर्धिनी केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी यांनी तयार केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे महिनाभरामध्ये कमीत कमी एक तासाचे ३२ योगसत्र आयोजित करण्यात यावेत.

२) ३२ योगसत्रांपैकी २० योगसत्र आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये व उर्वरित १२ योगसत्र कार्यक्षेत्रामध्ये (शाळा, आश्रमशाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत, महिला बचत गट, ज्येष्ठ नागरिक संघ व इतर शासकीय/निमशासकीय संस्था) घेण्यात यावीत.

३) ३२ योगसत्रांपैकी कार्यक्षेत्रामध्ये कमीत कमी एक तासाचे दोन IEC स्वरुपाचे उपक्रम राबविण्यात यावेत.

४) योगा विषयामध्ये आशा, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक व इतर कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेऊन क्षमता वृध्दी करण्यात यावी.

५) वैद्यकीय अधिकारी, आशा, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक यांना जनजागृती मोहिम आयोजित करण्यामध्ये मदत करणे.

६) योग विषयक दस्तऐवज नियमितपणे तयार करुन मासिक अहवाल सादरीकरणामध्ये मदत करणे. तसेच आशा, आरोग्य सेविका यांना कार्यक्षेत्रामध्ये योग विषयक उपक्रमामध्ये देखरेख करण्यास मदत करणे.

७) वर्षभरात कार्यक्षेत्रामध्ये समुदाय स्तरावर कमीत कमी दोन योग विषयक जनजागृती मोहिम मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात यावी.

८) योगसत्राकरिता मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.

९) आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रांसाठी निवड केलेल्या योग प्रशिक्षक (अर्ध वेळ)- (पुरुष/स्त्री) यांना रु.८,०००/- प्रतिमाह मानधन देय असून त्यांनी रु.२५०/- प्रतितास याप्रमाणे कमीत कमी ३२ तास/प्रतिमाह योगसत्र आयोजित करावयाची आहेत.

उपरोक्त मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करुन आपल्या जिल्हयातील यापुर्वी कार्यान्वित असलेले आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र व नव्याने मंजूर आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये योग प्रशिक्षक निवड करणेबाबत जिल्हास्तरावर कार्यवाही करण्यात यावी व करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करावे.

सोबतः- केंद्र शासनाकडून प्राप्त योग अभ्यासक्रम आयोजित
करणारी विद्यापीठे व संस्थांची यादी.

(डॉ. विजय कंदेवाड)
सहसंचालक (तांत्रिक),
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

प्रत माहितीस्तव सविनय सादरः-

मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

मा. संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळ (सर्व)

प्रत कार्यवाहीस्तवः-

जिल्हा आयुष अधिकारी (सर्व)



Scanned with CamScanner